# आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या दृष्टिक्षेपात पर्यावरण संरक्षण

**मनिषा मधुकर कुरणे** , संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

............................................................................................................

**प्रस्तावना**

समकालीन आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये पर्यावरण हा एक महत्त्वाचा राजकीय घटक म्हणून केंद्रस्थानी आकाराला आला आहे. पर्यावरणाच्या असमतोलामुळे व त्याच्या ऱ्हासामुळे निर्माण झालेल्या समस्या सर्व जगासमोर आव्हानाच्या रूपाने उभ्या आहेत. निसर्गाचा ऱ्हास हा मानवनिर्मित आहे. जगभराचा आर्थिक विकास हा पर्यावरणाच्या ऱ्हासावर उभा आहे. त्यातून सजीवसृष्टीच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला असल्यामुळे पर्यावरण संरक्षणाची जाणीव वैश्विक बनली आहे. 'सुरक्षित पर्यावरण' मानवाच्या आर्थिक, सामाजिक व्यक्तिमत्वावर पर्यायाने राष्ट्राच्या विकासावर परिणाम करणारा घटक आहे.

'पर्यावरण' म्हणजे आपल्या सभोवताली बसणारी हवा, पाणी, जमीन, वनस्पती, पशु—पक्षी आदींनी बनलेला परिसर. हवा, जमीन, पाणी या पर्यावरणाच्या मुलभूत घटकांमध्ये काही हानीकारक घटक मिसळल्यामुळे पर्यावरणाच्या या मुख्य घटकांच्या जैविक, रासायनिक, भौतिक गुणधर्मामध्ये बदल घडून येतात. त्यामुळे हे घटक निरूपयोगी बनतात. यालाच पर्यावरणाचे प्रदूषण म्हणतात. याचा परिणाम म्हणून वैश्विक तापमानवाढ, आम्लपर्जन्य, हरितगृह परिणाम, ओझोन क्षय हे पर्यावरणाच्या प्रदूषणाचे परिणाम आहेत.

मानवनिर्मित दूषित पदार्थामुळे पर्यावरणाचे प्रदूषण होते. पर्यावरणातील संपदांवर ताण पडतो. परिणामी पर्यावरणाचा समतोल बिघडतो. वाढती लोकसंख्या, आर्थिक आणि औद्योगिक विकासाची अनियंत्रित प्रक्रिया यातून पर्यावरणाचे प्रदूषण वाढले. आज जगाला वायूप्रदूषण, भूप्रदूषण, जलप्रदूषण, औष्णिक प्रदूषण, सागरी प्रदूषणाचे दुष्परिणाम भोगावे लागतात. कारखान्यातील विषारी पदार्थ, तेल आणि पेट्रोलिअम पदार्थ, कीटकनाशके, किरणोत्सारी पदार्थ, नदी—नाल्यामुळे समुद्राच्या पाण्याचे प्रदूषण वाढत आहे. त्यामुळे सागरी जैवविविधता नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. एका राष्ट्रातील प्रदूषणाचे परिणाम हे शेजारील दुसऱ्या राष्ट्रांनादेखील भोगावे लागतात. राष्ट्राच्या आंतरराष्ट्रीय संबंधावर हया गोष्टींचा प्रभाव पडतो.

परिणामी पर्यावरण या घटकाचा महत्वपूर्ण राजकीय शक्ती म्हणून उदय झाला आहे. पर्यावरणाचे संरक्षण हा मुद्दा आंतरराष्ट्रीय राजकारणात महत्वाची भूमिका बजावत आहे. राष्ट्रे आपल्या परराष्ट्र धोरणात लष्करी सुरक्षेप्रमाणेच पर्यावरण सुरक्षेला प्राधान्य देताना दिसतात. नैसर्गिक साधनसंपत्ती या आंतरराष्ट्रीय राजकारणातील सत्तेचा महत्त्वाचा घटक म्हणून उपयोग करताना त्याच्या प्राप्तीसाठी राष्ट्रांमध्ये तीव्र स्पर्धा आहे. त्याचबरोबर पर्यावरण संरक्षणाची जाणीवदेखील वैश्विक बनली आहे.

१९६०—७० च्या दशकादरम्यान अमेरिकेने व्हिएतनाम युद्धामध्ये 'एजेंट—ऑरेंज' या वनस्पतीनाशकाचा वापर केला, त्यामुळे व्हिएतनामधील अनेक प्रकारच्या वनस्पती नष्ट झाल्या. नद्या प्रदूषित झाल्या. एकूणच संपूर्ण पर्यावरण धोक्यात आले. व्हिएतनामच्या पर्यावरणाचा अमेरिकेकडून मोठया प्रमाणावर नाश झाला. या युद्धामध्ये अमेरिकेची सुद्धा मोठया प्रमाणावर मनुष्यहानी व वित्तहानी झाली. यातून अमेरिकेमध्ये युद्धविरोधी मानसिकता, नि:शस्त्रीकरण, अणवस्त्र प्रसार बंदी, पर्यावरण संरक्षण याविषयीच्या जाणीवा तीव्र झाल्या.

पर्यावरण संरक्षणाविषयीची मानसिकता घडविण्यास काही महत्वपूर्ण साहित्यकृतींनी योगदान दिले. 'रॅशेल कारसन' यांच्या 'सायलेंट स्प्रिंग' आणि 'पॉल एहरीश' यांच्या 'द पॉप्युलेशन बॉम्ब' या साहित्यकृतींनी पर्यावरण संरक्षणाचा सैद्धांतिक पाया घातला.

पर्यावरणाच्या ऱ्हासावर आधारित राष्ट्रीय विकासाचा प्रश्न विकसित आणि विकसनशील राष्ट्रांमधील संघर्षाचे प्रमुख कारण आहे. विकसनशील राष्ट्रांमधील आर्थिक आणि औद्योगिक विकासाची प्रक्रियाही पर्यावरणाच्या ऱ्हासावर आधारित आहे. ती पर्यावरण संरक्षणाशी सुसंगत असावी अशी विकसित राष्ट्रांची मागणी आहे. त्यांच्या मते, विकसनशील राष्ट्रांच्या पर्यावरण प्रदूषणाचे परिणाम विकसित राष्ट्रांना भोगावे लागतात. विकसनशील राष्ट्रांना हा आरोप मान्य नाही. त्यांच्या मते, पाश्चिमात्य राष्ट्रांमध्ये औद्योगिक क्रांती प्रथम झाली. औद्योगिक क्रांतीपासून पाश्चिमात्य राष्ट्रे (यूरोप, अमेरिका) पर्यावरणाच्या ऱ्हासास जबाबदार आहेत. आंतरराष्ट्रीय व्यापाराविषयीची नियमावली विकसित

राष्ट्रांना अनुकूल व्हावी यासाठी पर्यावरण मुद्यांचे भांडवल करून विकसनशील राष्ट्रांच्या विकासात अडथळे निर्माण केले जात आहेत.

पर्यावरणाच्या संरक्षणाच्या दृष्टिने संयुक्त राष्ट्र संघटनेची कार्यप्रणाली महत्वपूर्ण आहे. पर्यावरण संरक्षणासाठी जनमत गतिशील बनविण्यासाठी आणि मानवाकडून होणाऱ्या पर्यावरण ऱ्हासाला प्रतिबंध घालण्यासाठी १९६८ मध्ये संयुक्त राष्ट्र महासभा यांनी १९६८ मध्ये एका निर्णयांतर्गत क्षेत्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर कार्यवाही करण्यासाठी १९७२ साली 'स्टॉकहोम परिषद' घेण्यात आली. यामध्ये प्रदूषित नद्या, वायू प्रदूषण, अन्नधान्य प्रदूषण, रासायनिक युद्धप्रणाली, अवकाश संशोधन, औद्योगिकीकरणामुळे पर्यावरणाच्या ऱ्हासावर चिंता व्यक्त करण्यात आली. आणि भावी पिढीसाठी सुरक्षित पर्यावरण राखण्यासाठी माहितीच्या साधनांवर भर देण्यात आला. पर्यावरण संरक्षणाच्या जाहीरनाम्याद्वारे पालन होण्यासाठी ५४ सदस्यीय समिती स्थापन करण्यात आली. त्यातून ५ जून हा 'जागतिक पर्यावरण दिन' म्हणून साजरा करण्यात येत आहे.

पर्यावरणाची जाणीव वैश्विक बनविण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघटनेत एक ठराव मंजुर करण्यात आला. त्यानुसार पर्यावरण संरक्षण कार्यक्रम ठरविण्यात आला. त्या कार्यक्रमानुसार पर्यावरण संरक्षण चळवळींना प्रोत्साहन देणे, पर्यावरण चळवळी, पर्यावरण संस्था, संघटना समित्या यामध्ये समन्वय साधण्याचे काम करण्यासाठी ५८ सदस्यीय समिती करते. पर्यावरण चळवळींना प्रोत्साहन देण्याचे कामदेखील ही समिती करते. पर्यावरण तत्वांचे पालन होते की नाही हे देखील पाहते.

'सुरक्षित पर्यावरण' हा मानवाचा अधिकार आहे. व्यक्तीला सन्मानाने, स्वाभिमानाने जगण्यासाठी त्याच्या व्यक्तीमत्वाचा विकास मानून संयुक्त राष्ट्र संघटनेने घोषित केलेल्या मानवाधिकारामध्ये 'सुरक्षित पर्यावरणाचा' समावेश केला आहे. पर्यावरण व मानवाधिकार यांचा घनिष्ठ संबंध मानून मानवाधिकारामध्ये 'पर्यावरण संरक्षण, संवर्धन, संतुलन व शिक्षण' यांचा समावेश केला आहे. तसेच आतापर्यंत घेण्यात आलेल्या पर्यावरण परिषदांमध्ये संयुक्त राष्ट्र संघटनेची भूमिका महत्वपूर्ण आहे.

संयुक्त राष्ट्र संघटनेचे प्रयत्न जरी व्यापक असले तरी अमेरिकेसारख्या विकसित राष्ट्रांचे पर्यावरण संरक्षणासंबंधीची भूमिका दुटप्पी दिसते. पर्यावरण संरक्षणाचे मापदंड विकसनशील राष्ट्रांवर लादणारी अमेरिका प्रदूषण पसरविणाऱ्या राष्ट्रांमध्ये अव्वल स्थानावर आहे. पर्यावरण संरक्षणासंबंधीच्या महत्वाच्या क्योटो करारावर अमेरिकेने स्वाक्षरी केलेली नाही.

**संशोधन समस्या**

''आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या दृष्टिक्षेपात पर्यावरण संरक्षण'' या संशोधन समस्येचे अध्ययन करताना असे आढळले कि आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये पर्यावरण संरक्षणासाठी घेण्यात आलेल्या परिषदा, पर्यावरण संरक्षण व आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या सत्ता समतोलाच्या दृष्टिने संयुक्त राष्ट्र संघटनेची पर्यावरण संरक्षण जागृतीच्या प्रामाणिक प्रयत्नाच्या स्वरूपात दिसतात. या परिषदांच्या माध्यमातून पर्यावरण संरक्षण हा हेतू असला तरी विकसित राष्ट्रे विकसनशील राष्ट्रांच्या बाबत दुटप्पी भूमिका ठेवताना दिसतात. या परिषदांच्या माध्यमातून पर्यावरण संरक्षण त्यासाठी कायदे करण्याचा संयुक्त राष्ट्र संघटनेचा प्रयत्न दिसतो. पण हया प्रयत्नांनादेखील काही मर्यादा दिसतात.

या पर्यावरण परिषदांच्या धोरणातील वेगवेगळया गोष्टी त्यांचा आंतरराष्ट्रीय राजकारणावरील प्रभाव, परिषदांचे कायदे व नियम निर्मितीतील धन—ऋण गोष्टी, निर्माण होणारे दबाव, असंतूलन त्यातून खेळले जाणारे राजकारण जाणून घेणे, आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या परिपेक्ष्यात होणारे बदल, संयुक्त राष्ट्र संघटनेची भूमिका, आंतरराष्ट्रीय पर्यावरणवाद्यांची भूमिका जाणून घेणे, पर्यावरण चळवळींची भूमिका, पर्यावरण धोरणासमोरील आव्हाने कोणती आहेत इत्यादी संशोधन समस्ये संदर्भात आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या परिपेक्ष्यात होणाऱ्या घडामोडींचा अभ्यास करण्याच्या उद्देशाने संशोधकाने 'आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या दृष्टिक्षेपात पर्यावरण संरक्षण' हा अभ्यास विषय संशोधन समस्या म्हणून निवडला आहे.

**संशोधनाची व्याप्ती**

प्रस्तुत संशोधनाचे क्षेत्र हे आंतरराष्ट्रीय राजकारणातील पर्यावरण संरक्षणासाठीच्या परिषदा व राजकारण, पर्यावरण चळवळी यांच्या परिपेक्ष्यात असल्यामुळे पर्यावरणाच्या सर्व अंगाची क्षेत्रव्याप्ती न घेता फक्त या गोष्टींचे अध्ययन शोध प्रबंधामध्ये करण्यात येणार आहे. त्यात पर्यावरण संरक्षण, पर्यावरणवादाचा उदय विकास, पर्यावरण परिषदांची भूमिका, संयुक्त राष्ट्र संघटनेचा पर्यावरण संरक्षण

कार्यक्रम व त्याचा आंतरराष्ट्रीय राजकारणावर झालेला परिणाम. पर्यावरणवादी चळवळी, विकसित—अविकसित राष्ट्रांची भूमिका व त्यातून आकाराला आलेले शह—प्रतिशहाचे राजकारण इत्यादी घटकांवर संशोधन केंद्रीत होईल.

**संशोधनाची मर्यादा**

प्रस्तुत संशोधनाचा मध्यवर्ती गाभा 'आंतरराष्ट्रीय राजकारण' हा परिपेक्ष्य असल्यामुळे फक्त या मर्यादितच राहून अभ्यास विषयावर लक्ष केंद्रीत केले जाईल. त्यामुळे पर्यावरणाच्या व आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या सर्व परिपेक्ष्यांचा समावेश करणे ही संशोधकासमोरील मोठी अडचण आहे. तसेच पर्यावरण संरक्षण या विषयाचा आवाका मोठा असल्यामुळे सर्व क्षेत्रांचा अभ्यास करणे संशोधकाच्या आवाक्या बाहेरील आहे. त्यामुळे फक्त प्रस्तुत शोध प्रबंधात पर्यावरणाचा आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या परिपेक्ष्यावरच भर देण्यात येणार आहे.

**संशोधन विषयाचे महत्व**

आज जगाला पर्यावरणाच्या असमतोलामुळे अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. प्रदूषित वातावरण हे निसर्गाच्या असमतोलाचे प्रमुख कारण आहे. मानवाने निसर्गाची केलेली अविवेकी लुट, अपरिमित हानी हे आहे. 'सुरक्षित पर्यावरण' हे मानवाच्या भौतिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय विकासासाठी अत्यंत महत्वाचे आहे. सुरक्षित पर्यावरणात व्यक्तीच्या व्यक्तीमत्वाचा देखील विकास होतो. व्यक्तीचा विकास म्हणजे पर्यायाने राष्ट्राचा विकास. आर्थिक, औद्योगिक विकासाच्या संकुचित अर्थामुळे मानवाच्या हव्यासापोटी निसर्गाची बेसुमार हानी केल्याचे दिसते. या नैसर्गिक साधनसंपत्तीच्या उपलब्धतेवर स्वत:चा ताबा मिळविण्यासाठी जगभरातील अनेक राष्ट्रांमध्ये चाललेली तीव्र स्पर्धा या स्पर्धेतून निसर्गाची झालेली हानी यातून आंतरराष्ट्रीय राजकारणात वेगवेगळया समस्या निर्माण झाल्या. नवनवीन संकल्पना उदयाला आल्या. परस्परावलंबित्व वाढविणारी स्थिती निर्माण झाली. या सर्वातून सुरक्षित पर्यावरण आणि आर्थिक विकास यांची सांगड घालून मानवाला चिरकालीन विकास साधण्याची आवश्यकता आहे. आपले पर्यावरण सुरक्षित ठेऊन गरजा भागविताना त्याचबरोबर विकास साधताना पर्यावरणाची कमीत—कमी हानी झाली पाहिजे. त्यासाठी जागतिक पर्यावरण परिषदांमध्ये कडक भूमिका घेऊन सुयोग्य शिफारशी व त्यांच्या प्रभावी अंमलबजावणीचे प्रयत्न झाले पाहिजेत. त्यादृष्टीने आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या दृष्टिक्षेपात पर्यावरण संरक्षण या संशोधन विषयाचा अभ्यास होणे संशोधकाला महत्वाचे वाटते.

**संशोधनाचा उद्देश**

संशोधन समस्येचा अभ्यास करताना योग्य दिशेने संशोधन होण्यासाठी संशोधनाचा उद्देश निर्धारित करून त्याआधारे संशोधन कार्य पूर्णत्वास नेणे शक्य होऊ शकते. त्याकरिता संशोधकाने पुढील संशोधन उद्दिष्टये निश्चित केली आहेत. आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या दृष्टिक्षेपात पर्यावरण संरक्षण' या अभ्यासाची उद्दिष्टये पुढीलप्रमाणे.

१) पर्यावरण ऱ्हासाच्या कारणांचा अभ्यस करून त्यांच्या परिणामांचा शोध घेऊन पर्याप्त उपाय सुचविणे.

२) आंतरराष्ट्रीय राजकारणातील पर्यावरण संरक्षण समस्येचा अभ्यास करणे.

३) आंतरराष्ट्रीय राजकारणात पर्यावरण संरक्षणासाठी संयुक्त राष्ट्र संघटनेच्या प्रयत्नांचा अभ्यास करणे.

४) आंतरराष्ट्रीय राजकारणातील पर्यावरण संरक्षण परिषदांच्या माध्यमातून झालेल्या चर्चेचा आढावा घेणे.

५) पर्यावरण संरक्षणात येणाऱ्या अडथळयामागील आंतरराष्ट्रीय राजकारणाचा आढावा घेणे.

६) पर्यावरण संरक्षणात विकसित राष्ट्रे व अविकसित राष्ट्रे यांच्या भूमिकांचा व विसंवादाचे अध्ययन करणे.

**संशोधनाची गृहीतके**

संशोधकाला 'आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या दृष्टिक्षेपात पर्यावरण सरंक्षण' या संशोधन विषयाचे अध्ययन करीत असताना अनेक समस्या जाणवल्या. त्यामध्ये आंतरराष्ट्रीय परिषदांचे स्वरूप सकारात्मक की नकारात्मक या परिषदा जरी पर्यावरण संरक्षणाच्या हेतूने आयोजित केल्या जातात. पण यामध्ये विकसित राष्ट्रे आपली भूमिका एकाधिकारशाहीची ठेवतात का? त्यांची भूमिका विकसनशील राष्ट्रांच्या विकासात अडथळे निर्माण करण्याची किंवा विकासाची गती रोखण्याची आहेत का? त्याचा परिणाम आंतरराष्ट्रीय राजकारणावर कशाप्रकारे होतो. परिणामी पर्यावरण संरक्षणाचा हेतू साध्य होतो

का? अशा प्रकारचे प्रश्न उद्भवले. याची उत्तरे चिकित्सेतून अभ्यासपूर्ण शोधण्याचा प्रयत्न करणार आहे.

१) पर्यावरण ऱ्हासामध्ये मानवी हस्तक्षेप, आर्थिक विकासाच्या चूकीच्या कल्पनेने पर्यावरणाचा ऱ्हास व नैसर्गिक संपत्तीची अपरिमित हानी झाली आहे.

२) संयुक्त राष्ट्र संघटनेच्या पर्यावरण संरक्षण धोरणामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणात पर्यावरण समस्येला महत्व प्राप्त झाले.

३) संयुक्त राष्ट्र संघटनेच्या पुढाकाराने घेतलेल्या पर्यावरण परिषदांमुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर पर्यावरणाविषयी मोठया प्रमाणात जागृती निर्माण झाली.

४) आंतरराष्ट्रीय पातळीवर पर्यावरण संरक्षणासाठी संयुक्त राष्ट्र संघटना प्रामाणिक व विस्तृत प्रयत्न करताना दिसते.

५) पर्यावरण संरक्षणाच्या मुद्यांवरून विकसित आणि अविकसित राष्ट्रांच्या भूमिकेत विसंवाद व दुटप्पीपणा आढळतो.

६) पर्यावरण संरक्षणाच्या मुद्याचे भांडवल करून विकसित राष्ट्रे विकसनशील राष्ट्रांच्या विकासाची गती रोखत आहेत.

**संशोधन पद्धती**

'आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या दृष्टिक्षेपात पर्यावरण संरक्षण' या विषयांतर्गत संशोधनात पर्यावरणाच्या संरचनासंबंधी वेगवेगळया आंतरराष्ट्रीय संस्था व संघटना, पर्यावरण चळवळी, पर्यावरण परिषदा, पर्यावरणाचे राजकारण, पर्यावरणीय संकल्पना यांचा अंतर्भाव करून संशोधन केले जाणार आहे. या विषयासाठी 'ऐतिहासिक, विश्लेषणात्मक' संशोधन पद्धतीचा वापर करून तथ्य संकलन, विश्लेषण व सुयोग्य निष्कर्षासाठी संशोधन क्षेत्राच्या आवश्यकतेनुसार प्राथमिक आणि दुय्यम साधनांचा वापर करण्यात येईल. अनुभववादी औपचारिक साहित्याच्या उपलब्धीनुसार समाजशास्त्रीय पद्धतीचा अवलंब प्रस्तूत संशोधनासाठी केला जाणार आहे.

**प्राथमिक साधने**

संयुक्त राष्ट्र संघाने घेतलेले निर्णय, आंतरराष्ट्रीय कायदे, आंतरराष्ट्रीय पर्यावरण परिषदांचे अहवाल, चर्चासत्रे, परिसंवाद शोधनिबंध यांचा आधार घेण्यात येणार आहे.

**दुय्यम साधने**

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधन विषयाशी निगडीत संशोधन ग्रंथ वर्तमानपत्रे, मासिके, त्रैमासिके, संशोधन पत्रिका यातील लेख तसेच विविध संकेत स्थळांचा आधार घेण्यात येणार आहे.

**संदर्भ सूची :**

1 Goudie A. S., (1993) The Human Impact on Environment, Oxford, Backwell.

2) Barrow C. T., (2005) Environment Management and development, Routladge, London.

3) Brudland H. (1987) Our Common future (Report) world commition Environment and development, Oxford University Press.

4) Khor Martin (2001) Rethinking Globlization: Critical Issue and Policies, Books for change, Banglore.

5) Saxena H. M. (2010) Environmental Geography, 2nd ed. Rawal Publication, Jaipur.

6) Agarwal S. K. (2005) Environmental Management RPH, Pub. Co. New Delhi.

7) Sinhal A. C. (2016) Contemparary Political Issue.

8) Devalankar Shailendra (2016) Vidhya Book Publishers, Aurangapura, Aurangabad.

9) Hussain Majid (2015) Access Publishing India Pvt. Ltd.